१०५८

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १२०/प्रनिप्रा/१२९२ दिनांक : 23 MAY 2022

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, **दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ५२व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व ५) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, तथा अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व २) डॉ. जी.टी. केदार, सहाय्यक परिक्षा समन्वयक, उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईकसंचालनालय, पुणे हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | ०७/०४/२०२२ | दुपारी १२:०० वा. | उच्च शिक्षण | बी.एड. |
| | | दुपारी ०३:०० वा. | | बी.पी.एड. |

विषयांकित अभ्यासक्रमामध्ये एकूण ५४२ (बी.एड. = ४८६ + बी.पी.एड. = ५६) महाविद्यालये होती. सदर महाविद्यालयांचा प्रवेश पडताळणी अहवाल संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक ०७/०४/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे प्राप्त झाला. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५, कलम ९(५) मधील तरतुदीनुसार संबंधित महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करणे अनिवार्य आहे. सदरील महाविद्यालयांकडून तसा प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे संबंधीत महाविद्यालयांचे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत.

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी डिपार्टमेंट ऑफ फिजीकल एज्युकेशन, मुंबई विद्यापीठ, मुंबई या महाविद्यालयाने प्रवेश पडताळणी अहवाल विहित कालावधीमध्ये सादर न केल्याचे नमूद केले आहे. या महाविद्यालयाने अधिनियम, २०१५ च्या ९(५) च्या तरतूदींचे उल्लंघन केले असल्याने सदर महाविद्यालयास रु. ०१ लाख दंड आकारण्यात येत असल्याबाबत प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे. सदरचा दंड महाविद्यालयाने प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे भरणा करावा, असे निर्देश पारीत करण्यात आले.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

**(क) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारींबाबंत.**

आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रकरणी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी केलेली कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे **(प्रपत्र - अ)**

**(ख) प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत गट - क व गट - ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्तेबाबत भोसले समितीच्या अहवालास अनुसरुन प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीतील विषय क्रमांक ४ मधील अ.क्र. १ नुसार माहे एप्रिल २०२२ पासून ५% दराने वेतन वाढ करण्याचा तसेच ११ महिन्यांकरिता नियुक्तीस मुदतवाढ देण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे **(प्रपत्र-ब)**.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे व प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 23 MAY 2022